॥ श्री येमाई देवी प्रसन्न ॥



# श्री येमाई देवी ट्रस्ट

ट्रस्ट र.नं.ए. १२६६/पुणे/१९६९

श्री क्षेत्र कनेरसर, ता. खेड (राजगुरुनगर), जि. पुणे.


अध्यक्ष
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड कोर्ट

सचिव
निरीक्षक धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे

संचालक
तहसिलदार ता.खेड, जि.पुणे

संचालक
पोलीस निरीक्षक खेड पोलीस स्टेशन

संचालक
सरपंच, ग्रा.पं.कनेरसर ता.खेड, जि.पुणे


जावक क्र. :- 48/2021

दि. 01/10/२०21

## श्री. यमाई देवी ट्रस्ट, कनेरसर रजि.क. ए. 1266/पुणे.

## प्रेस नोट

**श्री. यमाई देवी मंदिर, कनेरसर, तालुका खेड येथे सार्वजनिक नवरात्रोत्सव वर्ष–2021 मंदिर कोरोनाविषयक नियम पाळून भाविकांना दर्शनासाठी सुरू राहील परंतु, गर्दी होणारे सर्व कार्यकम रद्द.**

दिनांक 30/09/2020 रोजी श्री. यमाई देवी ट्रस्ट, कन्हेरसर च्या विश्वस्त मंडळाची बैठक पार पडली. सदरील बैठकीमध्ये येणा–या दिनाक 07/10/2021 ते 15/10/2021 या नवरात्र व दसरा सणाचे नियोजन झाले. उपस्थित सदस्यांमध्ये सर्वानुमते असे ठरले की, येणा–या नवरात्रात व कोजागिरी पौर्णिमा या सणांमध्ये मंदिर **शासन नियम** पाळून तसेच **कोरोनाविषयक** नियम पाळून भाविकांना दर्शनासाठी खुले राहील. परंतु, गर्दी होणारे मोठे कार्यक्रम जसे हरिनाम सप्ताह, यात्रा, उत्सव, महाप्रसाद, दिंडी/पालखी, दिपप्रज्वलन व दांडीया/गरवा इत्यादी कार्यकमांना परवानगी असणार नाही.

तसेच, प्रशासक समितीतर्फे भाविकांना असे आवाहन करण्यात येते की, त्यांनी **शासन नियम** पाळून तसेच **कोरोनाविषयक** नियम पाळूनच मंदिरात ठरविलेल्या वेळेत व मर्यादित संख्येत मंदिरात प्रवेश करावा. लहान मुले, गर्भवती महिला, वयोवृद्ध नागरिक तसेच, आजारी व्यक्ती यांनी नवरात्र उत्सवादरम्यान मंदिरात प्रवेश टाळावा.

विश्वस्तांच्या सभेत पुढे असेही ठरले की, देवीची पारंपारीक पुजा, आरती, नैवेद्य तसेच घटस्थापना इत्यादी विधी मोजक्याच उपस्थितीत पार पाडण्यात येतील.

तसेच देवस्थान ट्रस्ट तर्फे सर्व किरकोळ/मोठे व्यापारी व दुकानदार, ग्रामस्थ, गुरव, पुजारी, परडीवाले व भाविकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी मंदिर परिसरात किंवा देवीच्या जुन्या मंदिर परिसरात कोठेही गर्दी जमवू नये.

तसेच देवस्थान ट्रस्ट तर्फे सर्व भाविकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी देवस्थानच्या www.yamaidevi.com या संकेत स्थळाला किंवा देवस्थानच्या प्राधिकृत फेसबुक (Facebook) पेजवर भेट देवून ऑनलाईन दर्शनाचा लाभ घ्यावा व सदरील संकेतस्थळावर नमुद देवस्थानचा बँक खात्याचा तपशिलाचा वापर करुन देवस्थानास देणगी द्यावी.

तरी देवस्थान ट्रस्ट तर्फे सर्व भावीकांना व संबंधीतांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वर नमुद कार्यासाठी समितीला सहकार्य करावे व **शासन नियम** पाळून तसेच **कोरोनाविषयक** नियम पाळून कोरोना व्हायरसचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी सहकार्य करावे.

(श्री. दे. बा. पतंगे)
अध्यक्ष
श्री.येमाई देवी ट्रस्ट,कनेरसर
ता.खेड,जि.पुणे

(श्रीमती. रागिणी खडके)
सचिव
श्री.येमाई देवी ट्रस्ट,कनेरसर
ता.खेड,जि.पुणे

Sd/xxx
(श्रीमती. वैशाली वाघमारे)
संचालक
श्री.येमाई देवी ट्रस्ट,कनेरसर
ता.खेड,जि.पुणे

(श्री. सतीशकुमार गुरव)
संचालक
श्री.येमाई देवी ट्रस्ट,कनेरसर
ता.खेड,जि.पुणे

Sd/xxx
(श्रीमती सुनिता केदारी)
संचालक
श्री.येमाई देवी ट्रस्ट,कनेरसर
ता.खेड,जि.पुणे